<u>नि. फौ. ख. क्र.२५९/२०१५</u> निशाणी ३२

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

नाव – संजय परशराम तायडे

वय – ५४ वर्षे, व्यवसाय – पी.एस.आय., पोलीस मुख्यालय, अकोला

पत्ता – रा. राजरत्न कॉलनी, मलकापूर, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. एच. ए. जुनारे यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी उरळ पो.स्टे. येथे सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये हे.कॉ. म्हणून कार्यरत होतो. दि.०२८.०५.२०१५ रोजी सकाळी ९ ते रात्री ९ असे ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी अनिल भगवान सरकटे हे पो.स्टे. येथे फिर्याद देण्याकरीता आले होते, कारण त्यांना त्याचा भाऊ अजय भगवान सरकट यानी आईच्या पासबुक मागण्यावरुन लोखंडी रॉडने डोक्यावर व पाठीवर मारुन दुखापत केली होती. त्यांचा फिर्यादी जबाब हा मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंद करुन घेतला. आता मला सदर फिर्यादी जबाब दाखविण्यात आला त्यावर फिर्यादीची सही असून ती मी ओळखतो कारण त्यानी माझ्यासमक्ष सही केली. तसेच सदर जबाबावर माझी देखील सही आहे. तसेच सदर जबाबावर सहा. पोलीस निरीक्षक श्री. काटकर यांचा गुन्हा नोंद करणेकामी शेरा आहे. (सदर फिर्यादी जबाबास नि.क्र.२५ देण्यात आलेले आहे.) सदर जबाब नोंद केल्यानंतर आरोपी अजय सरकटे याच्या विरुध्द भा.दं.सं. कलम ३२४ अन्वये गन्हा दाखल करण्यात आला. आता मला सदर गुन्ह्याची छापील फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर माझी व फिर्यादीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास नि.क्र.२६ देण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास हा वरीष्ठांच्या आदेशाने हे.कॉ. श्री. चाटी यांच्याकडे वर्ग करण्यात आला.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. पी. उपर्वट यांचे मार्फत उलटतपासः</u>**

२. फिर्यादी ज्यावेळी पो.स्टे.येथे फिर्याद देण्याकरीता आले त्यावेळी मी त्यांच्या कडे त्यांच्या ओळखीबाबत त्यांचे ओळखपत्र, मतदान कार्ड व आधारकार्ड हे मागितले

नव्हते. आता मला नि.क्र.२५ कडील फिर्यादी जबाब दाखविण्यात आला त्यावर पो.स्टे.चा शिक्का आणि सहीच्या खाली पदनाम व त्यांचे नाव नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची फिर्याद ही माझ्या मर्जीनुसार नोंद केलेली आहे. आता मला नि.क्र.२६ कडील छापील फिर्याद दाखविण्यात आली त्यावर सहीच्या खाली पो.स्टे.चा शिक्का उमटविलेला नाही. सदरचा शिक्का हा नि.क्र.२६ च्या वरच्या बाजूस उमटविलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, खोटा पुरावा देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२५ व २६ कडे फिर्यादीने सही केली, हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २३.०७.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.07.23 14:45:02 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. दयानंद एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | २३/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | २३/०७/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | २३/०७/२०२५ |